जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 APR 2025
पुढारी

# 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक उपेक्षित महात्मा' पुस्तिकेचे आज प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त २४ रोजी विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात दुपारी ४ वाजता डॉ. एन. डी. पाटील लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे: एक उपेक्षित महात्मा' या पुस्तिकेचा प्रकाशन समारंभ सरोज पाटील यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमासाठी ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस, प्राचार्य. डॉ. टी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 APR 2025
लोकमत



अशोकराव माने फार्मसी कॉलेजमध्ये ज्योती जाधव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. यावेळी मनीषा माने, दीप्ती माने, डॉ. नीलेश चौगुले, धनराज जडगे उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी नवसंकल्पनांचा शोध घ्यावा : ज्योती जाधव

**खोची :** सर्वच क्षेत्रात सातत्याने बदल होत आहेत. या बदलांना सामोरे जाताना वर्तमान स्थितीत आवश्यक असणाऱ्या घटकावर संशोधन होणे गरजेचे आहे. यासाठी जिज्ञासू, चिकित्सकपणे नव्या संकल्पनांचा शोध घेतला पाहिजे. विद्यार्थ्यांनी संशोधनात्मक अभ्यास पद्धतीवर भर देत कौशल्य सिद्ध करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

अंबप येथील अशोकराव माने इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेजमध्ये आयोजित पारितोषिक वितरणावेळी त्या बोलता होत्या. माजी जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने अध्यक्षस्थानी होत्या.

जाधव म्हणाल्या, संशोधनासाठी योग्य विषयाची निवड करावी. त्याची गरज संशोधनातून समोर आणावी. संशोधन म्हणजे नव्या संकल्पनांचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे, हे प्रथम अभ्यासावे. मनीषा माने म्हणाल्या, महाविद्यालयीन जीवनात संशोधक वृत्ती गतिमान करावी. ज्योती जाधव यांनी गूळच्या दर्जेदार गुणात्मक निर्मितीसाठी संशोधन केले आहे. नैसर्गिक गोडव्यासाठीच्या पर्यायांवर होणारे संशोधन अधिक नावीन्यपूर्ण ठरले आहे. यावेळी सरपंच दीप्ती माने, प्राचार्य डॉ. एन. बी. चौगुले होते.

24 APR 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला ८६ हजार ३३ विद्यार्थी

शिवाजी विद्यापीठातून

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला ८६ हजार ३३ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेदरम्यान सोमवारी ५६ गैरप्रकार उघडकीस आले आहेत.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांमध्ये सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. मंगळवारी बीए., बी.कॉम., बीएस्सी., बीसीए., बीए.बीएड., बीआयडी (इंटिग्रेटेड), एमएड., एमबीए.,बीडीएफसी, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन आदी ७८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने १६८ केंद्रांवर झाल्या. दरम्यान, दि. २१ रोजी एम.फार्मसीच्या विविध सत्रांचे निकाल घोषित करण्यात आले. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. दि. २२ रोजी या पथकाकडून कोल्हापूर (३८), सांगली (१६) व सातारा जिल्ह्यातून (०२) अशा एकूण ५६ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.